# वरिष्ठ विज्ञान महाविद्यालयाचे २३ पासून शिबिर

शहादा : शहादा तालुका को-ऑप. एज्युकेशन सोसायटीच्या वरिष्ठ विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबिर २३ ते २९ डिसेंबर या कालावधीत कलसाडी येथे होणार आहे.

शिबिराचे उद्घाटन शहादा तालुका को-ऑप. एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन मोतीलाल पाटील यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थानी शहादा पंचायत समितीच्या सभापती वांगीबाई पावरा असतील. प्रमुख अतिथी म्हणून पं.स. उपसभापती द्वारकाबाई

◆ या शिबिरात ४० विद्यार्थी सहभागी होणार असून विविध क्षेत्रातील मान्यवरांना आमंत्रित करण्यात आले असून त्यांची व्याख्याने होणार आहेत.

गांगुर्डे, मानद सचिव ए.के. पटेल, नामदेव पटले, रासेयोच्या विभागीय समन्वयक डॉ.मृणाल जोगी, कलसाडीचे वैद्यकीय अधिकारी डॉ.चंद्रकांत सामुद्रे, कलसाडीचे सरपंच राजेंद्र ठाकरे, ग्रामविकास वाचनालयाचे अध्यक्ष किरण चौधरी व कलसाडी जि.प. शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र पाटील उपस्थित राहणार आहेत.

शिबिराचे नियोजन प्रभारी प्राचार्या नयना कुलकर्णी, कार्यक्रम अधिकारी प्रा.भूषण निकम, सहायक कार्यक्रम अधिकारी सोनाली पाटील, प्रा.हर्षल खैरनार, विद्यार्थी प्रतिनिधी देवेंद्र निकुंभे, मयूरी पाटील, किशोर पाटील, राहुल पाटील, गणेश पाटील, भरत धनगर, विनायक पाटील व चंद्रकांत भोपे हे करीत आहेत.

लोकमत २२डिसें१५ (वार्ताहर)
(मंगळवार)

# शहादा कॉलेजचे तिखोरा येथे शिबिर

**शहादा :** शहादा तालुका को.ऑप. एज्युकेशन सोसायटी संचलित विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागांतर्गत विशेष शिबिर तिखोरा येथे घेण्यात आले. या शिबिराच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन मोतीलाल फकिरा पाटील होते.

विद्यार्थ्यांनी आपत्कालासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व उपाययोजनांचा तांत्रिकरित्या अभ्यासपूर्ण केला. त्यात पोहणे, आगीपासून बचाव, भूकंप व अपघातावेळीची समयसूचकता, बॉडी ॲसेसमेंट, सी.पी.आर.च्या पद्धती, मुलीच्या आत्मसंरक्षणासाठी कराटे वर्गाचे प्रशिक्षण देण्यात आले.

◆ शिबिरात विविध गाठीचे प्रकार शिकविण्यात आले. तसेच वेगवेगळ्या पद्धतीचा तंत्रशुद्ध पद्धतीने प्रात्यक्षिकाचा सराव शिबिरार्थींनी केला. तसेच पर्यावरण संरक्षणासाठी वृक्षसंवर्धनाचा संदेश देऊन विविध विषयांवर पथनाट्य सादर करण्यात आले.

या कार्यक्रमात महाराष्ट्र राज्याच्या चॅन्सलर ब्रिगेडच्या सदस्यांची मदत घेण्यात आली. समारोपप्रसंगी उमविचे सिनेट सदस्य अतुल कदमबांडे, प्रा.गौतम थोरात, डॉ. अविनाश निकम, तिखोरा येथील मुख्याध्यापक प्रा.माळी, डॉ.एस.पी. गिरासे, एस.एन.डी.टी.चे प्रभारी प्राचार्य एल.एन. चौधरी, प्रा.ए.के. पाटील, प्राचार्य डॉ.आर.डी. पाटील, कार्यक्रम अधिकारी प्रा.नयना कुलकर्णी, प्रा.डॉ. संदीप मराठे उपस्थित होते. (वार्ताहर)

लोकमत दि. १९ जाने १४ (रविवार)

राजू वसावे

लोकमत नंदुरबार, सोमवार, दि. ५ जानेवारी २०१५ ३

# रासेयोच्या विद्यार्थ्यांकडून वाहतुकीबाबत जनजागृती

## शहादा : निबंध स्पर्धा, पथनाट्याचे आयोजन

शहादा : शहादा तालुका को-ऑप. एज्युकेशन सोसायटी संचलित विज्ञान व वरिष्ठ महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत नागरिकांना स्वरक्षणार्थ रस्त्यावरील नियमांचे पालन कशा पद्धतीने केल्याने आपण स्वतःचे व निरपराध नागरिकांचे प्राण वाचवू शकतो यासंदर्भात जनजागृती करण्यात आली.

रस्ता सुरक्षा अभियान व सुरक्षित वाहतुकीसाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. रस्ता सुरक्षा एक जीवनदायी उपक्रम असून, सुरक्षा ही एक काळाची गरज आदी विषयांवर निबंध स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत विविध महाविद्यालयातील ३० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. तसेच भित्तीपत्रकांच्या माध्यमातून प्रदर्शनही आयोजित करण्यात आले होते. त्याचप्रमाणे शहरातील विविध प्रभाग, बस स्टॅण्ड, भाजी मार्केट परिसरात पथनाट्याद्वारे जनजागृती करण्यात आली. याप्रसंगी शहादा पोलीस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षेविषयी विविध नियमांची माहिती दिली. हे अभियान यशस्वितेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.भूषण निकम, प्रभारी प्राचार्या नयना कुलकर्णी, प्रा.ए.के. पटेल यांचे मार्गदर्शन लाभले. (वार्ताहर)

उपस्थित होते.

## शहादा महाविद्यालय

येथील [illegible].ता.को ऑप विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात महात्मा गांधी व [illegible]लबहादूर शास्त्री जयंतीचे औचित्य लक्षात घेऊन विविध वेगवेगळ्या स्पर्धेचे आयोजन करून कार्यक्रम साजरा करण्यात , आला. दरम्यान महिला महाविद्यालयाचे प्राचार्य एस.एन. चौधरी, विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य ए.के. पटेल यांनी गांधीजी व शास्त्रीजी यांच्या जीवनचरित्र्या बद्दल आपले विचार प्रकट केले. यावेळी विद्यार्थ्यांमधून रवींद्र महाजन या विद्यार्थ्याने मनोगत व्यक्त केले. प्रा.भूषण निकम यांनी गांधीजींच्या चरित्र्याबद्दल माहिती देऊन गांधीजींनी दिलेली प्रतिज्ञा विद्यार्थ्यांना दिली. ६ ऑक्टो २००८ लोकमत

लोकमत
रविवार,
दि.१६ ऑक्टोबर २०११



शहादा येथील विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रीय सेवायोजनेच्या फलक अनावरणप्रसंगी संस्थाध्यक्ष मोतीलाल पाटील, प्राचार्य आर.डी.पाटील, जे.पी.बिन्हाडे, ए.के.पाटील, सी.व्ही.चौधरी.

# विज्ञान महाविद्यालयात रासेयो एकक स्थापन

**शहादा** । दि.१५

**शहादा** तालुका को-ऑप.एज्युकेशन सोसायटी संचलित विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ संलग्नित व विद्यार्थी कल्याण विभाग पुरस्कृत राष्ट्रीय सेवा योजनेच्या एककाची स्थापना करण्यात आली.

संस्थाध्यक्ष मोतीलाल पाटील यांच्या हस्ते फलक अनावरण करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व व त्याची पार्श्वभूमी डॉ.एस.आर.मगरे यांनी सांगितली.

प्राचार्य डॉ.आर.डी.पाटील यांनी अनुभव मांडले. समन्वयक प्रा.कुलकर्णी, उपसमन्वयक प्रा.जितेंद्र पाटील, प्रा.अंजली महाजन यांनी सत्कार केला. विद्यार्थी चित्रा पटेल, प्रियंका कासार, रुपाली वाणी व अतुल पाटील यांनी सूत्रसंचालन केले. महिला महाविद्यालयाचे प्राचार्य एल.एन.चौधरी यांनी प्रास्ताविक केले. प्रा.ए.के.पटेल व शिक्षक हजर होते.

# विज्ञान महाविद्यालयात रासेयोदिनी सांस्कृतिक कार्यक्रम

देशदूत २८ सप्टे २०१३ (शनिवार)

शहादा (ता.प्र.)-

येथील शहादा तालुका को.ऑप. एज्युकेशन सोसायटी संचलित विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले.

फक्त युवा शक्तीच्या निर्धारामुळे आणि युवकांना मुक्तपणे आपले अभिव्यक्ती स्वांतंत्र्य व्यक्त करण्यासाठी महाविद्यालयाने विविध कार्यक्रमाचे आयोजन केले होते. त्यात प्रामुख्याने एकूण १८ प्रकारातून विविध प्रकाराचा अभिनव अविष्कार सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून साकारण्यात आला. त्यात विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला. सदर कार्यक्रमासाठी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ.पंकज नन्नवेर, सहाय्यक सुनिल पाटील व शहादा तालुक्याचे 'रासेयोचे विभागीय समन्वय डॉ.अविनाश निकम प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थित होते.

डॉ.नन्नवरे यांनी येथील रासेयो एककाच्या कार्याचा गौरव केला व अशाप्रकारे आदिवासी बहुल भागात उत्कृष्ट काम केल्याने सर्वांचे अभिनंदन केले. डॉ.अविनाश निकम यांना समाधान व्यक्त करत या छोटयाशा युनिटचे आदर्श निर्माण केल्या अशा प्रकारच्या भावना व्यक्त केल्या पाहूण्याचे स्वागतासाठी प्राचार्य ए.के. पाटील, कार्यक्रमाधिकारी नयना कुलकर्णी आदी उपस्थित होते. तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक व नियोजन, कार्यक्रमाधिकारी भूषण निकम यांनी तर सुत्रसंचालन सचिन कोळी यांनी केले.

आपला महाराष्ट्र

शनिवार १० जानेवारी २०१५

## प्रा.भुषण निकम यांचे समुपदेशन

शहादा दि. ९ (प्रतिनिधी)- प्रकाशा येथील सर्वोदय माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयातील समुपदेशन केंद्रात प्रा. भुषण निकम यांनी गट समुहाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे समुपदेशन केले. विद्यार्थ्यांनी दिशाहीन न होता स्वत:साठी दिशा दर्शक कसे बनावे? १२ वी नंतर काय? कोणत्या शाखा पारंपारीक शिक्षणापेक्षा वेगळ्या आहेत या बाबत प्रा. निकम यांनी मार्गदर्शन केले. ते पुढे म्हणाले, विद्यार्थ्यांनी मेकॅट्रॉनिक्स, ऑप्टीकल केमिस्ट्री, पेट्रोकेमिकल, हवाई सुंदरी, स्पर्धा परिक्षा आदींमध्ये संधी शोधावी. यावेळी मुख्याध्यापक सोमा चौधरी यांच्यासह शाळेतील शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. प्रा. सैय्यद मुदस्सर यांनी सुत्र संचलन व आभार व्यक्त केले.

## विज्ञान महाविद्यालयात एड्स जनजागृती सप्ताह

शहादा दि. ९ (प्रतिनिधी) : येथील श.ता.को.ऑप.एज्यु.सोसा. संचलित विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रीय एड्स जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. यावेळी शहरातून घोषणांसह रॅली काढण्यात आली. पोस्टरच्या माध्यमातून चित्ररुपाने संदेश देण्यात आलेत. यावेळी महाविद्यालयात भिंतीपत्रकाचे प्रदर्शनही करण्यात आले. प्रदर्शनाचे उद्घाटन प्रा. ए. के. पटेल, प्र. प्राचार्य नयना कुलकर्णी यांच्या उपस्थितीत झाले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा. भुषण निकम व रासेयोच्या स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

आपला महाराष्ट्र

मंगळवार १५ जानेवारी २०१३

# वरिष्ठ विज्ञान महाविद्यालयातर्फे रासेयो शिबीरात बेटी बचाव अभियान

शहादा (का.प्र.)- येथील श.ता.को.एज्यु. सोसा. संचलित, विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबीर शहादा नगर पालिकेचे मुख्याधिकारी डॉ. पंकज पवार यांच्या उपस्थित संपन्न झाले. शिबीरादरम्यान बेटी बचाव व स्त्रीभ्रुण हत्या थांबविण्यासाठीची जनजागृती करुन निबंध व वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष जयदेव पाटील होते.

तिखोरा ह्या दत्तक गावात आरोग्यासाठीच्या स्वच्छता विषयक बाबीवर डॉ. विलास पटेल, डॉ. स्मिता जैन ह्या तज्ञांचे मार्गदर्शनपर व्याख्याने तर कायदेविषयक आणि पर्यावरण संरक्षण व संवर्धन करीता अॅड. जसराज संचेती, डॉ. यु.व्ही निळे आदींनी मार्गदर्शन केले. समारोपा प्रसंगी डॉ. पंकज पवार यांनी स्त्रीयांनी पुढे आले पाहिजे व स्त्री भ्रुण हत्ये विरुध्द आपणास कोणत्याही स्वरुपाची शासकिय मदत तात्काळ उपलब्ध करवून देण्यात येईल. त्या बाबतची सतर्कता व जाणीव लक्षात घेवून कार्य करण्याचे आवहन केले. जयदेव पाटील यांनी समाजविघातक कृत्यासाठी महिलांनाच कारणीभूत न धरता पुरुषानेही आपल्या जबाबदाऱ्यांचे पालन करावे असे उदबोधन केले. शिबीरार्थी विद्यर्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्राचार्य डॉ. आर. डी. पाटील यांनी विद्यार्थ्यांशी विविध विषयांवर हितगूज साधले. समारोप कार्यक्रमा वेळी विविध मान्यवर प्रामुख्याने अभिजीतभाई पाटील, प्रा. ए. के. पटेल, कार्यक्रम अधिकारी प्रा नयना कुलकर्णी, प्रा. डॉ. दिपाली गावंडे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

समारोप कार्यक्रमा वेळी प्रास्ताविकातून रा. से. यो. सहप्रमुख प्रा. भूषण निकम यांनी शिबीरात उपस्थित ३० विद्यार्थी, विद्यार्थीनींनी केलेल्या कामाबाबत माहिती दिली.

तसेच शिबीरादरम्यान राबविलेले विविध उपक्रम व त्यासाठी केलेले प्रयत्न अशा सर्व विषयांवर माहिती दिली. शिबीर यशस्वी झाल्याने संस्थेचे चेअरमन मोतीलाल पाटील यांनी सर्व प्राध्यपकांचे अभिनंदन केले.

शेवटी सहा. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. योगेश वसू यांनी आलेल्या पाहुण्याचे व गावकऱ्यांच्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रतिक्षा पाटील, शालीनी जायस्वाल, कविता बाफना, मनिषा पाटील या विद्यार्थीनींनी केले.

# विज्ञान महाविद्यालयात विविध उपक्रम

शहादा : विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय शहादाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विभागातर्फे विविध उपक्रम साजरे करण्यात आले.

प्रमुख वक्ते प्रा.पुरुषोत्तम पाटील व प्रा.सचिन पाटील यांनी मार्गदर्शन केले. या वेळी मीनल गिरासे, तृप्ती पाटील, दीपाली साटोटे या विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केले.

संस्थेचे चेअरमन मोतीलाल पाटील, उपाध्यक्ष जयदेवभाई पाटील, सचिव विलासभाई पाटील, प्राचार्य जे.पी. बिऱ्हाडे, उपप्राचार्य एच.वाय. पठाण, प्रा.एच.एम. पाटील, सी.व्ही. चौधरी, प्राचार्य डॉ.आर.डी. पाटील, प्रा.ए.के. पाटील यांच्या उपस्थितीत महाविद्यालयाच्या प्रांगणात वृक्षारोपण करण्यात आले.

कार्यक्रमासाठी सचिन कोळी, प्रतीक्षा पाटील, गणेश गिरासे, नीतेश पाटील यांनी व सहायक कार्यक्रम अधिकारी प्रा.भूषण निकम, विनायक पाटील, चंद्रकांत भोपे, राहुल पाटील यांनी परिश्रम घेतले. (वार्ताहर)

◆ सद्‌भावना दिन, आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन साजरा करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवक विद्यार्थिनी शालिनी जयस्वाल, पूजा पाटील, सीमा पाटील, राजश्री रावल या विद्यार्थिनींनी कार्यक्रमाचे आयोजन केले.

# विज्ञान महाविद्यालयाचे आजपासून कलसाडीला शिबिर

**सकाळ वृत्तसेवा**

## राष्ट्रीय सेवा योजना, २९ डिसेंबरला समारोप

बामखेडा, ता. २२ : शहादा येथील तालुका को- ऑप. एज्युकेशन सोसायटीच्या विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष हिवाळी शिबिर उद्या (ता. २३)पासून कलसाडी (ता. शहादा) येथे होणार असून २९ डिसेंबरला समारोप होईल.

शहादा तालुका को. ऑप. एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन मोतीलाल पाटील यांच्या हस्ते उद्घाटन होईल. पंचायत समितीच्या सभापती वांगीबाई पावरा अध्यक्षस्थानी असतील. पंचायत समितीच्या उपसभापती द्वारकाबाई गांगुर्डे, संस्थेचे मानद सचिव प्रा. ए. के. पाटील, तज्ञ संचालक नामदेव पटेल, राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय समन्वयक डॉ. मृणाल जोगी, कलसाडी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकिय अधिकारी डॉ. चंद्रकांत सामुद्रे, सरपंच राजेंद्र ठाकरे, ग्रामविकास वाचनालयाचे अध्यक्ष किरण चौधरी, राजेंद्र पाटील प्रमुख पाहणे असतील. शिबिरा दरम्यान उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ अधिसभा सदस्य डॉ. मृणाल जोगी, डॉ. संजयकुमार शर्मा, डॉ. पुष्कर शास्त्री, प्रा. जयपालसिंह शिंदे, सहायक प्रा. डी. वाय. पाटील, एस. पी. गाणू, प्रा. प्रमोद खैरनार, डॉ. एम. के. कदम, प्रा. के. एल. कुमारे, प्रा. भुषण निकम या व्याख्यात्यांचे आजची युवा पिढी व रासेयोचे महतव, प्रफुल्लीत मनासाठी भक्तीचे महत्व, ज्येष्ठ नागरिकांचे जीवनमान व त्यांच्याकडील ज्ञानाचे जतन व संवर्धन, कथाकथन शामची आई, राष्ट्रीय एकात्मतेकरीता जनजागृती तर ग्रामीण जीवनाच्या विकासात युवकांचे महत्व या विषयावर बौद्धीक सत्रे होणार आहे. शिबिराचा समारोप २९ डिसेंबरला होणार आहे. शहादा पोलिस ठाण्याचे निरीक्षक संजय महाजन अध्यक्षस्थानी असतील. संस्थेचे उपाध्यक्ष हिरालाल पाटील, जिल्हापरिषद सदस्य अभिजित पाटील, कलसाडीचे पोलिस पाटील प्रमोद चौधरी, विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन जयेश चौधरी, राजेंद्र चौधरी, गिरधर चौधरी, बाबूलाल चौधरी, राजाराम चौधरी, दौलत रामोळे, डॉ. अविनाश निकम उपस्थित राहतील. दरम्यान शिबिरात ४० विद्यार्थ्यांचा सहभाग असून प्राचार्या नयना कुलकर्णी, कार्यक्रम अधिकारी प्रा. भुषण निकम, सहायक कार्यक्रम अधिकारी सोनाली पाटील, प्रा. हर्षल खैरनार, राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी प्रतिनिधी देवेंद्र निकुंभे, मयूरी पाटील, किशोर पाटील, राहूल पाटील, गणेश पाटील, भरत धनगर, विनायक पाटील, चंद्रकांत भोपे परिश्रम घेत आहेत.

सकाळ 23 डिसें 2015 (बुधवार)

लोकमत नंदुरबार, सोमवार, दि. १२ जानेवारी २०१५ २

# वरिष्ठ विज्ञान महाविद्यालयाचे कलसाडी येथे हिवाळी शिबिर

शहादा : शहादा तालुका को-ऑप. एज्युकेशन सोसायटी संचलित विज्ञान, वरिष्ठ महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष हिवाळी शिबिर कलसाडी येथे घेण्यात आले.

या शिबिराचा शुभारंभ पुष्पदंतेश्वर साखर कारखान्याचे माजी चेअरमन मुकुंद प्रल्हाद चौधरी यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी संस्थेचे चेअरमन मोतीलाल फकिरा पाटील, सचिव डॉ.विलास पटेल, महिला महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य एल.एन. चौधरी, सरपंच राजेंद्र ठाकरे, अध्यक्ष ग्रामविकास वाचनालयाचे किरण चौधरी, मुख्याध्यापक राजेंद्र गोविंद पाटील उपस्थित होते.

शिबिरात राबविण्यात आलेल्या उत्कृष्ट उपक्रमामुळे कलसाडी येथील ग्रामस्थांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवक व प्राध्यापकांचे कौतुक केले. तसेच आर.डी. परेडसाठी विद्यार्थ्यांकडून तयारी करुन घेण्यात आली. या शिबिराच्या समारोपप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष जयदेव पाटील, जिल्हा परिषद सदस्य अभिजित पाटील, ज्येष्ठ नागरिक राजेंद्र चौधरी, प्रमोद काशिनाथ चौधरी, पोलीस पाटील, गिरधर चौधरी, दौलत रामोळे, ग्रामसेवक आदी उपस्थित होते.

## पथनाट्य सादर

◆ ग्रामीण भागाशी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांची नाळ जुळावी यासाठी गावातील नागरिकांसाठीही प्रबोधन सत्राचे संध्याकाळच्या वेळी आयोजन करण्यात आले. तसेच विविध विषयांवर ग्रामीण जीवनाशी निगडित पथनाट्य सादर करण्यात आले होते.

प्रास्ताविक, सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सहायक कार्यक्रम अधिकारी प्रा.भूषण निकम यांनी केले. या वेळी विद्यार्थी व प्राध्यापक सचिन पाटील, प्रा.हर्षल खैरनार, प्रा.सविता पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्रथम प्रभारी प्राचार्य ए.के.पटेल, प्रभारी प्राचार्या प्रा.नयना कुलकर्णी यांची विशेष उपस्थिती लाभली. यशस्वितेसाठी राकेश पाटील, विनायक पाटील, चंद्रकांत भोपे, गणेश पाटील यांनी परिश्रम घेतले.

(वार्ताहर)

१६ जाने २०१६ (शनिवार) सकाळ

# 'रासेयो'च्या विद्यार्थ्यांना मिळाली ७५० पुस्तके भेट

## शहादा महाविद्यालयात 'एक पुस्तक भेट' अभियान उपक्रम

बामखेडा (ता. शहादा), ता. १५ : येथील विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे राबविण्यात येत असलेल्या 'एक पुस्तक भेट अभियानां'तर्गत ७५० पुस्तके भेट मिळाली आहेत. या अभियानांतर्गत स्वयंसेवक घरोघरी जाऊन जुनी पुस्तके जमा करीत आहेत.

शहादा तालुका एज्युकेशन सोसायटील संचलित विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे 'एक पुस्तक भेट अभियान' राबविले आहे. या अभियानांतर्गत स्वयंसेवक घरोघरी जाऊन जुनी पुस्तके जमा करीत आहेत. त्यातून मोठ्या प्रमाणात वाचन संस्कृती वाढविण्यासाठी प्रयत्न होत आहे. या पुस्तकांत वेगवेगळी मॅगेझिन, धार्मिक पुस्तके, सुविचार संग्रह, पाककला, स्पर्धा परीक्षाविषयक, विज्ञान व शैक्षणिक पुस्तकांचा समावेश आहे. या सर्व पुस्तकांचे महाविद्यालयात स्वतंत्र ग्रंथालय असेल व त्यात पुस्तकांचा वापर हा सर्व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना होऊन शैक्षणिक पुस्तकांव्यतिरिक्तही पुस्तकांचे ज्ञानार्जन कशा पद्धतीने करता येईल, याकडे लक्ष दिले जात आहे. या अभियानांतर्गत आजपर्यंत ७५० पुस्तके भेट मिळाली आहेत. हे अभियान तीन फेब्रुवारीपर्यंत सुरू राहील. अभियान वाचन संस्कृती वृद्धीस लागावी, यासाठी इच्छुक असणाऱ्या व्यक्तींनी जुनी नसतील तर नवीन पुस्तके भेट दिली तरी चालणार आहे. अभियान समन्वयक म्हणून प्रा. भूषण निकम कामकाज पाहत आहेत. त्यांना प्रा. सोनाली पाटील, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. हर्शल खैरनार, प्रा. सविता पाटील सहकार्य करीत आहेत.

# सर्व धर्म समभाव समतेचा संदेश देणारे रासेयो शिबीर

शहादा दि.३० (प्रतिनिधी) : येथील श.ता.को. ऑप एज्यु. सोसा. लि. वरिष्ठ महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे हिवाळी शिबीर नुकतेच संपन्न झाले. शिबीरात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शतकोत्सवी वर्षानिमित्ताने समता व सर्वधर्मसमभाव या प्रकल्पाचा समावेश करण्यात आला होता.

शिबीरात विविध धार्मिक गट विभागणी करुन धर्म संस्थापकाची माहिती व सण उत्सव साजरे करण्यात आल्याने सहभागी विद्यार्थी-विद्यार्थीनींना सर्व धर्मीयांचा परमेश्वर एक आहे याचा संदेश दिला. तसेच गावातून सद्भावना रॅली काढण्यात आली. या रॅलीत धार्मिक गीते म्हणण्यात आली. तसेच शिबीरातील विद्यार्थ्यांनी सर्व धर्माच्या पोशाख परिधान करुन शिबीरात वावरत असल्याने सर्व धर्मियांचा पोशाख व त्यांच्या चालीरिती समजण्यास मदत होत होती. विविध ज्वलंत विषयावर तब्बल १८ पथनाट्य व सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले. दरम्यान, विद्यापीठामार्फत नियुक्त शहादा विभागीय रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी डॉ. मृणाल जोगी व जिल्हा समन्वयक डॉ. अविनाश निकम यांनी शिबीरस्थळी भेट देवून गौरवोद्गार काढले. कार्यक्रम अधिकारी भुषण निकम यांनी कौतू केले आहे. संस्थेतर्फे मानद सचिव ए. के. पटेल यांनी शिबीरास विशेष भेट देवून मार्गदर्शन केले.

समारोपीय कार्यक्रमास संस्थेचे उपाध्यक्ष हिरालाल पाटील, जि. प. सदस्य अभिजित पाटील, मानद सचिव ए. के. पटेल, प्राचार्य नयना कुलकणी, प्रभारी प्राचार्य काकासाहेब अनपट, पोलिस पाटील प्रमोद चौधरी, जि. प. मुख्याध्यापक राजेंद्र पाटील, ज्येष्ठ नागरिक बधुलाल चौधरी, राजाराम चौधरी आदींची उपस्थिती होती. सुत्रसंचलन विनय पटेल, मयुरी पाटील यांनी तर प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. भुषण निकम यांनी केले. आभार सोनाली पाटील व सहाय्यक कार्यक्रम अधिकारी हर्षल खैरनार यांनी केले. शिबीर यशस्वीतेसाठी प्रा. सविता पाटील, गणेश पाटील प्रयत्न केले.

आपला महाराष्ट्र ३१ डिसेंबर २०१५ (गुरुवार)

# शहाद्यात राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे रस्ता सुरक्षा सप्ताहात जनजागरण

आ. महाराष्ट्र १० डिसें २०१३ (मंगळवार)

शहादा (का.प्र.) : येथील श.ता.को.ऑप.एज्यु. सोसा. संचलित विज्ञान वरिष्ठ महाविद्यालाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत रस्ता अपघात अकाली मृत्यू मुखी पडणाऱ्या युवा वर्गाची संख्या लक्षात घेता महाराष्ट्र शासनाच्या रस्ता सुरक्षा जागृती अभियानाच्या अनुषंगाने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

अभियानातील जनजागृतीच्या प्रयत्नाना अधिक गती मिळावी या हेतूने दि.१ते०७डिसेंबर या कालावधीत रस्ता सुरक्षा व सुरक्षीत वाहतुक सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. त्यात सुरक्षा वाहतुक उपक्रमांतर्गत महाविद्यालयात पोस्टर्स स्पर्धा, हेल्मेटचे पुजन तसेच रस्ता सुरक्षीतेच्या जनजागृतीसाठी रॅली, व्याख्याने व सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा उपयोग करण्याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. पोस्टर्स स्पर्धेत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी सुरक्षीत वाहतुकीविषयी विविध पोस्टर्स सादर केलेत. रस्ता सुरक्षतेतेसाठीचे नियम व नियमांच्या अंमलबजावणीबाबत शहादा पोलिस स्टेशनचे वाहतुक विभागीचे ए.एस.आय. हरीभाऊ चौधरी, पोलिस कॉं. विलास पाटील यांनी मार्गदर्शन केले. यावेळी हेल्मेट पूजन प्रा. ए. के. पटेल, प्रा. नयना कुलकर्णी, जितेंद्र गिरासे व पो.कॉं. रघुनाथ मराठे यांनी केले. तसेच रस्ता सुरक्षा जनजागृती रॅलीत राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन एन.एस.एस. सहा. कार्यक्रम अधिकारी प्रा. भुषण निकम, शिक्षकेत्तर कर्मचारी राहुल पाटील, किशोर पाटील, राकेश पाटील यांनी सहकार्य केले.



लोकमत दि. ११ जाने २०१३ (बुधवार)

# रस्ता सुरक्षा सप्ताहांतर्गत शहाद्यात जनजागृती रॅली

ईश्वर पाटील




**जनजागृती :** शहादा येथे रस्ता सुरक्षा सप्ताहानिमित्त काढण्यात आलेल्या जनजागृती रॅलीचा हिरवी झेंडी दाखवून शुभारंभ करताना हरिभाई चौधरी. सोबत प्रा.ए.के. पाटील, प्रा.भूषण निकम आदी.

**शहादा :** रस्ता सुरक्षा व सुरक्षित वाहतूक सप्ताहानिमित्त शहादा तालुका को-ऑप. एज्युकेशन सोसायटीच्या विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे जनजागृती रॅली काढण्यात आली.

रॅलीत प्रा.ए.के. पटेल, कार्यक्रम अधिकारी प्रा.नयना कुलकर्णी, प्रा.भूषण निकम, वाहतूक शाखेचे जमादार हरिभाई चौधरी सहभागी झाले. रॅलीसाठी पो.कॉ. रघुनाथ मराठे, जितेंद्र चौधरी, राहुल पाटील, किशोर पाटील, राकेश पाटील आदींनी परिश्रम घेतले. (वार्ताहर)

लोकमत 3 oct 2024 (शनिवार)

# विज्ञान महाविद्यालयात रासेयोतर्फे विविध उपक्रम

शहादा : शहादा तालुका एज्युकेशन सोसायटी संचलित विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात रासेयोतर्फे विविध उपक्रम राबविण्यात आले.

प्रारंभी महाविद्यालय परिसरात स्वच्छता करण्यात आली. त्यानंतर प्रा.दुर्गा जाधव यांचे 'महिला सबलीकरण व सशक्तीकरण' या विषयावर व्याख्यान झाले. प्रा.जाधव यांनी महिलांनी स्वसंरक्षण कसे करावे यावर प्रात्यक्षिके करून दाखविली. या वेळी संस्थेचे चेअरमन मोतीलाल पाटील, उपाध्यक्ष हिरालाल पाटील, मानद सचिव ए.के. पटेल, प्रकाश पाटील, जि.प. सदस्य अभिजित पाटील, शरद पाटील, हिरालाल पाटील, विश्वनाथ पावरा, गजेंद्रगीर गोसावी, नरेंद्रकुमार शाह, नामदेव पटले, महिला महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य के.जे. अनपट, प्रा.अनिल जगदाळे, प्रा.सविता पाटील, प्रा.डॉ. संदीप मराठे, प्रा.दीपक पाटील, प्रा.हर्षल खैरनार, प्रा.पुरुषोत्तम पाटील उपस्थित होते. प्रास्ताविक व सूत्रसंचालन रासेयोचे सहायक कार्यक्रम अधिकारी प्रा.भूषण निकम यांनी, तर आभार मयूरी पाटील यांनी मानले. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या नयना कुलकर्णी व राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.सोनाली पाटील यांनी मान्यवरांचे स्वागत केले.

दुपारच्या सत्रात झालेल्या कार्यशाळेत पालक-विद्यार्थी-शिक्षक असा त्रिकोणी संयोग साधून विद्यार्थ्यांच्या समस्या व उपाययोजनांसाठी प्रत्येक घटकांची असलेली महत्त्वपूर्ण भूमिका याविषयी विद्यार्थी, पालक व शिक्षकांमधूनच मनोगत व्यक्त करण्यात आले.

या कार्यशाळेप्रसंगी प्रा.निशा पाटील, प्रा.गायत्री पाटील, दीपक पाटील उपस्थित होते. सूत्रसंचालन योगेश संदानशिव व वैभवी गुंजाळ यांनी, तर आभार देवेंद्र निकुंभे यांनी मानले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी विविध भित्तीपत्रिकांचे प्रदर्शन मांडले होते. कार्यक्रमासाठी प्रा.भूषण निकम, प्रा.हर्षल खैरनार, विनायक पाटील, चंद्रकांत भोपे, राहुल पाटील, किशोर पाटील, गणेश पाटील, राकेश पाटील आदींनी परिश्रम घेतले. (वार्ताहर)